


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ६० वा ❑ भारतीय सौर दिनांक २१ चैत्र शके १९४८, शनिवार दि.११ एप्रिल २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## महिलांचा छळ एक गंभीर सामाजिक प्रश्न

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

विवाहित महिलांचा छळ हा गंभीर सामाजिक आणि कायदेशीर प्रश्न आहे, जो शारीरिक, मानसिक आणि आर्थिक अत्याचाराच्या स्वरूपात समोर येतो. हुंडाबळी, घरगुती हिंसाचार आणि कौटुंबिक छळामुळे महिलांना अनेकदा आत्महत्येस प्रवृत्त केले जाते. या विरोधात भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ आणि कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ अंतर्गत कठोर कारवाईची तरतूद आहे, ज्याद्वारे पीडित महिला न्याय मागू शकतात.कठोर कायदा अस्तित्वात असताना देखील विवाहित महिलांना सासरच्या मंडळींकडून व पतीकडून होणारा छळ हा गंभीर प्रश्न असून हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे.

महिलांचा होणारा छळ मग तो हुंडाबळीचा असो किंवा अत्याचाराचा ही केवळ एक प्रथा नसून ती समाजातील स्त्रियांबद्दलची घृणास्पद मानसिकता आहे, जी आधुनिक समाजात अजिबात खपवून घेता कामा नये. याविरुद्ध संघटित लढा देणे गरजेचे आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे एका घटनेत जेवणात केस सापडल्याच्या किरकोळ कारणावरून पतीने केलेल्या अमानुष मारहाणीला कंटाळून २५ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ईश्वरी अजय बनकर असे मृत महिलेचे नाव असून, याप्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथिल पोलिसांनी पतीसह सासरच्या ७ जणांना बेड्या ठोकल्या आहेत.

ईश्वरीचा विवाह २८ जून २०२० रोजी भावसिंगपुरा येथील श्रावस्ती कॉलनीतील अजय अशोक बनकर याच्याशी झाला होता. अजय हा महानगरपालिकेच्या घनकचरा विभागात प्रभारी जवान म्हणून कार्यरत आहे. लग्नात ईश्वरीच्या वडिलांनी मोठ्या प्रमाणावर हुंडा, सोने आणि घरगुती वस्तू दिल्या होत्या. मात्र, तरीही अजय अतिरिक्त पैशांसाठी आणि प्लॉटचे हप्ते भरण्यासाठी ईश्वरीचा शारीरिक व मानसिक छळ करत होता.

मिळालेल्या माहितीनुसार, ६ एप्रिल रोजी रात्री ११ च्या सुमारास जेवणात केस निघाल्याने अजयचा संयम सुटला. त्याने ईश्वरीला रक्तबंबाळ होईपर्यंत जनावरासारखी मारहाण केली. रात्रभर वेदना सहन केल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा तिला त्रास देण्यात आला. अखेर या सततच्या छळाला कंटाळून ईश्वरीने मंगळवारी टोकाचे पाऊल उचलत गळफास घेतला.

या घटनेनंतर ईश्वरीच्या माहेरच्यांनी घाटी रुग्णालयात ठिय्या धरून कठोर कारवाईची मागणी केली. पोलिसांनी तत्परता दाखवत खालील आरोपींवर गुन्हा दाखल करून पतीसह सात जणांना अटक केली आहे यामध्ये , अजय बनकर (पती), दिनेश बनकर, दिलीप बनकर, चंद्रमणी बनकर, छाया बनकर, आशिष बनकर,गणेश बनकर अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या न्यायालयीन कारवाईमध्ये अटक करण्यात आलेल्या सर्व आरोपींना न्यायालयाने १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

हुंडाबळी आणि घरगुती हिंसाचाराच्या अशा घटना समाजासाठी कलंक आहेत. किरकोळ कारणावरून एका तरुण मुलीला जीव गमवावा लागणे ही बाब अत्यंत वेदनादायी आहे. दोषींना कठोर शिक्षा व्हावी, हीच जनभावना आहे.


घरगुती हिंसाचार आणि हुंडाबळी हे भारतीय समाजाला लागलेले गंभीर सामाजिक कलंक आहेत, जे महिलांच्या मूलभूत मानवी हक्कांचे आणि सन्मानाचे उल्लंघन करतात. ३०% पेक्षा जास्त भारतीय स्त्रिया शारीरिक, भावनिक किंवा लैंगिक अत्याचाराला बळी पडतात हुंड्यासाठी होणारा छळ आणि हत्या, विशेषतः ग्रामीण भागात, पितृसत्ताक मानसिकता आणि स्त्रीला दुय्यम स्थान देण्याच्या मानसिकतेतून निर्माण होतात, ज्यामुळे दरवर्षी हजारो महिलांचा अनैसर्गिक मृत्यू होतो.

# सुधीर रसाळ यांच्यावरील ऊब ही महीतलीचे उद्या प्रकाशन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – शिक्षक, समीक्षक या शब्दांना आपल्या आचार, विचार आणि साक्षेपी वृत्तीने एका उंचीवर नेऊन ठेवणाऱ्या आणि संपूर्ण महाराष्ट्राला ज्यांच्याविषयी आदर आहे, अशा गुरुवर्य सुधीर रसाळ यांचा आगळा-वेगळा गौरव सोहळा रविवार, दि. १२ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. सुधीर रसाळ सरांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये उलगडून दाखवणारे ऊब ही महीतली या इंद्रजित भालेराव लिखित पुस्तकाचे प्रकाशन यावेळी करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राला ज्यांच्या कवितांने विचारप्रवृत्त केले, अशा प्रा. इंद्रजित भालेराव यांच्या मनात त्यांच्या या गुरुवर्यांविषयी असलेल्या भावना आणि आदर या पुस्तकातील पाना पानांमध्ये दिसून येतात. स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे, प्रा. डॉ. कैलास अंभुरे यांच्या हस्ते ऊब.. चे प्रकाशन होणार असून, रसाळ सरांच्या राहत्या घरी, प्राइड सेंच्युरी कम्युनिटी हॉल, पन्नालाल नगर येथे हा कार्यक्रम सायंकाळी ४.३० वाजता होणार आहे, असे हेमंत मिरखेलकर आणि विलास फुटाणे यांनी कळवले आहे.




डॉ. सुधीर नरहर रसाळ हे मराठीतील सुप्रसिद्ध समीक्षक आहेत. त्यांनी दिल्लीच्या साहित्य अकादमीमध्ये मराठीचे प्रतिनिधित्व केले आहे. इ .स. १९५६ पासून ते मराठी वाङ्मयाची समीक्षा करीत आहेत. साहित्यविषयक लेखन, समीक्षा लेखन आणि संपादनात त्यांचा हातखंडा आहे. रसाळ हे सन १९९० ते १९९३ या काळात छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) विद्यापीठाच्या मराठी भाषा व वाङ्मय विभागाचे प्रमुख होते.

# शेतमांडवातली सोनेरी सांज...

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पूर्वी गावाकडं शेतात होणारी लग्नं म्हणजे केवळ सोहळा नव्हता; ती माती, माणसं आणि आठवणी यांची एक सुंदर मैफल असायची. आजच्या भव्य हॉल, झगमगत्या लाईट्स आणि डीजेच्या आवाजात ती साधी, पण मनाला भिडणारी लग्नं कुठेतरी हरवून गेली आहेत. पण ज्यांनी ती पाहिली, अनुभवली, त्यांच्या मनात त्या आठवणी अजूनही पावसाच्या पहिल्या सरीसारख्या ताज्या आहेत.

गावात लग्न ठरलं की पहिली चाहूल लागायची ती शेतात. घरासमोरचं ते शेत, जिथे वर्षभर जोंधळा, बाजरी किंवा हरभऱ्याची पिकं वाऱ्यावर डोलत असायची, तिथेच लग्नाचा मांडव उभा राहायचा. बैलांनी शेत नांगरून आणि सारवून ते अगदी आरशासारखं स्वच्छ केलं जायचं. त्यानंतर सुरू व्हायचा बांबू, दोर आणि झावळ्यांचा सुरेख खेळ. मजबूत बांबू रोवून त्यावर रंगीत कापडाचा मंडप चढवला जायचा. झेंडूच्या सोनसळी फुलांच्या माळा, आंब्याच्या हिरव्यागार पानांची तोरणं आणि वाऱ्यावर डोलणाऱ्या रंगीबेरंगी पताकांनी संपूर्ण वातावरण मंगलमय होऊन जायचं. कुठेही कृत्रिमतेचा लवलेश नव्हता; सर्व काही साधं, पण मनाला भिडणारं.



लग्नाच्या आधीचे दोन-तीन दिवस म्हणजे गावासाठी खऱ्या अर्थाने उत्सव असायचा. कुणी मंडप उभारायचं, कुणी पानांची तोरणं बांधायचं, तर कुणी स्वयंपाकाच्या तयारीत मग्न असायचं. ‘‘हे आपल्या घरातलं लग्न आहे‘‘, या एका भावनेनं सगळं गाव कामाला लागायचं. त्या सामूहिक श्रमांतून जिव्हाळ्याचं आणि आपुलकीचं एक अदृश्य नातं तयार होत असे. आज पैशानं सगळं मिळतं; पण त्या श्रमांतून उमलणारा स्नेह मात्र विकत मिळत नाही.

हळदीचा सोहळा रंगायचा तेव्हा अंगण जणू गीतांनी फुलून जायचं. बायका एकत्र जमून पारंपरिक ओव्या म्हणायच्या. त्या ओव्यांत कधी मायेची ऊब असायची, कधी मिश्किल चिमटे, तर कधी नवदांपत्यासाठी मनापासून दिलेले आशीर्वाद. जात्यावर धान्य दळताना उमटणाऱ्या त्या सुरांनी घरभर एक वेगळीच लय पसरायची.

|| संस्कृती ||

मंगेश दौंडकर, पुणे,
मो.- 9890619354



आणि मग उगवायचा तो मंगल दिवस. नवरा-नवरीच्या कपाळावर मोत्यांच्या आणि फुलांच्या मुंडावळ्या बांधल्या जायच्या. त्या मुंडावळ्यांमधून डोकावणारे लाजरे चेहरे, कपाळावरचा टिळा आणि अंगावरची पारंपरिक वेशभूषा सगळंच निरागस सौंदर्यानं उजळून निघायचं. नवरदेवाची मिरवणूक निघाली की ढोल-ताशांच्या गजरानं गाव दुमदुमून जायचं. लेझीमच्या तालावर तरुणांची पावलं आपोआप थिरकू लागायची. संध्याकाळी सूर्य मावळतीकडे झुकला की आकाश लालसर-सोनेरी रंगांनी न्हाऊन निघायचं आणि त्या मंद प्रकाशात मांडव अधिकच मोहक दिसायचा. फुलांच्या सुगंधात, सनईच्या मधुर सुरांत आणि मंत्रांच्या पवित्र स्वरांत दोन जीवांचा संसार सुरू व्हायचा.

खरी रंगत यायची ती जेवणात. लांबच लांब रांगा लावून पंगती बसायच्या. श्रीमंत-गरीब, लहान-मोठा असा कोणताही भेद नसायचा. पत्रावळीवर वाढलेलं जेवण म्हणजे जणू प्रेमाचीच मेजवानी. गरमागरम भातावर ओतलेलं वरण, बाजूला भाजी आणि एखादा गोड पदार्थ. गावची तरुण पोरं प्रेमानं वाढायला पुढे असायची. ‘‘पाव्हणं, अजून बुंदी वाढू का?‘‘ त्या प्रश्नातच आपुलकी ओसंडून वाहायची. पानावरून उठताना दिलेली तृप्तीची ढेकर म्हणजे सुगरणींच्या कष्टाचं खरं कौतुक असायचं.

आणि मग यायचा तो हळवा क्षण, निरोपाचा. सजवलेल्या बैलगाडीसमोर सगळ्यांच्या डोळ्यांत पाणी दाटायचं. वधू जेव्हा त्या गाडीत बसायची, तेव्हा तिच्या डोळ्यांतलं पाणी जणू शेतातल्या मातीत मिसळायचं. जणू ती मातीच आपल्या लेकीला निरोप देताना हळवी व्हायची. बैलगाडीचे घुंगरू हलकेसे वाजत राहायचे आणि धूळ उडवत ती गाडी हळूहळू नजरेआड व्हायची. तोपर्यंत साऱ्यांची नजर तिकडेच खिळून राहायची.

आज सोयीसुविधा वाढल्या आहेत, लग्नसमारंभ अधिक भव्य झाले आहेत; पण त्या लग्नांमधला जिव्हाळा, तो साधेपणा आणि तो मातीचा सुगंध कुठेतरी हरवून गेला आहे. आजच्या चकचकीत हॉलमध्ये आणि कृत्रिम फ ुलांच्या सजावटीत तो ओलावा सापडत नाही, जो गावाकडच्या शेतातल्या लग्नात असायचा.

काळ बदलला, माणसं बदलली, पद्धती बदलल्या; पण काळजाच्या एका कोपऱ्यात आजही तो जुना मांडव उभा आहे. जिथे सनईच्या सुरांसोबत मातीचा सुगंध दरवळतो आणि वाऱ्याच्या झुळुकीसोबत अक्षतांचे तांदूळ अंगावर पडतात. पुन्हा एकदा वाटतं, त्या जुन्या मांडवाखाली जावं, त्या मातीत बसावं आणि पुन्हा एकदा त्या साध्या, पण सुंदर आयुष्याचा अनुभव घ्यावा.












## जात्यावरच्या ओव्या......


आला सण आखाजीचा
लेक दोन जीवाची
बैस सावलीला बये
संग अमानत लोकाची ||५८६||

आम रसाच्या संगती
गोड पुरणाची पोळी
सुस्तावल्या लेक, सुन
लेकराची लेकुरवाळी ||५८७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग १७

ज्योतिर्मय साहित्य




आपले जीवन म्हणजे परमेश्वराने दिलेली एक सुंदर आणि अनमोल भेट आहे. या भेटीचा आपण सदुपयोग करायचा की दुरुपयोग करायचा हे आपल्यावर अवलंबून आहे. अंधाराकडून प्रकाशाकडे, वाईटकडून चांगल्याकडे अशी आपली वाटचाल व्हायला हवी.

जीवनाला अनेकदा रंगमंचाची उपमा दिली जाते. त्या रंगमंचावर प्रत्येकाला एक भूमिका मिळालेली असते. त्या भूमिकेचे प्रामाणिकपणे आणि उत्तम प्रकारे सादरीकरण करणे हेच आपले कर्तव्य आहे. एखादा शिक्षक असेल तर त्याने आदर्श शिक्षक होण्याचा प्रयत्न करावा. डॉक्टर, इंजिनियर किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात असलेली व्यक्ती आपल्या कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करत असेल तर तेच तिचे खरे साधन आहे.



आपल्या वाट्याला आलेले कर्म म्हणजेच आपला स्वधर्म आहे. संत ज्ञानेश्वर म्हणतात -

''स्वये आचरिता स्वकर्म ।
ते स्वकर्म स्वयं होई ब्रह्म ।।''

म्हणूनच माणसाने आपले कर्म उत्तम करणे आवश्यक आहे. जीवनात येणारी सुखदुःखे ही आपल्या प्रारब्धानुसारच येतात हे ज्यांच्या लक्षात येते, ते शहाणे लोक त्यांचा शांतपणे स्वीकार करतात. ते व्यर्थ चिंता करत बसत नाहीत.

परंतु जे या तत्त्वाला समजून घेत नाहीत, ते मात्र दुःख आणि खेद यांच्या गर्तेत अडकून पडतात. स्वधर्म विसरला की माणूस विकारांच्या आहारी जातो, आसक्ती वाढते आणि त्यातून निर्माण होणारी कर्मे त्याला अधिकाधिक बंधनात अडकवतात. परिणामी तो जन्ममृत्यूच्या चक्रात गुरफटत राहतो.

जर आपण खरोखरच हे मानत असू की जीवन ही परमेश्वराने दिलेली अनमोल भेट आहे, तर आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा आपण सुंदर उपयोग करायला हवा. आपल्या कर्तृत्वाने जीवनपथ उजळून टाकायला हवा. कर्तव्य करताना फळाची अपेक्षा न ठेवता निरपेक्ष भावनेने कर्म करणे आणि ते परमेश्वराला अर्पण करणे हीच जगण्याची खरी रीत आहे. अन्यथा तेच कर्म बंधनकारक ठरून दुःखाला कारणीभूत होते.

स्वसंवाद : मी माझ्या आयुष्यातील घडणाऱ्या घटनांबद्दल खूप चिंता करतो का?

जे काही घडते ते माझ्या संचिताचे फळ आहे हे मी मान्य करतो का ?

माझ्या हातातील वर्तमानकाळ मी चांगल्या कर्मासाठी वापरतो आहे का ?


स्वधर्माचे पालन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी करतो का?

कर्तव्य करताना मी फळाची अपेक्षा ठेवतो का, की निरपेक्ष भावनेने कर्म करण्याचा प्रयत्न करतो?

(क्रमशः)




## अभिमानाची पूर्णाहुती हाच खरा यज्ञ



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

पाण्याचा रंग कोणता म्हणून विचारले तर काय सांगता येईल ? त्याचप्रमाणे भगवंत आहे. ज्याप्रमाणे पाहाल त्याप्रमाणे तो आपल्याला दिसेल. आपल्यामधल्या विकारांमुळे तो आपल्याला निराळा दिसू लागतो. खरोखर, भगवंताचे खरे स्वरूप जाणणारे विरळाच. ज्याचे विकार कमी, त्याला भगवंताची प्रचीती जास्त. एकच राम चोहोकडे कसा असेल, हे म्हणणे भ्रमाचे आहे. सर्व अवतार एका भगवंताचेच आहेत. नारायण हा लहानपणचा अवतार आहे, कारण तो सर्वांचा आदि आहे. राम हा तरुणपणचा अवतार, आणि कृष्ण हा म्हातारपणचा अवतार समजावा. भगवंताला जन्ममरण नाही. तो तर सच्चिदानंद आहे; मग त्याचा जन्म कशाला करायचा असे काहीजण विचारतात. एका घरामध्ये बाहेरच्या खोलीत पोरे दंगामस्ती आणि आरडाओरडा करीत होती. आजोबा घरात आहेत हे त्यांना माहीत नव्हते. आपण घरामध्ये आहोत ही जाणीव त्या पोरांना देण्यासाठी, खाकरा आला नसताना देखील, आजोबा नुसते खाकरले. ते ऐकल्याबरोबर पोरे लगेच गप्प बसली. त्याचप्रमाणे भगवंताला जन्म नसूनसुद्धा, ‘ तो आहे ’ ही जाणीव होण्यासाठी त्याचा जन्म करायचा असतो. भगवंत आहे ही जाणीव झाल्यानंतर, आपण विषयामध्ये दंगामस्ती करणार नाही आणि तो बेताने भोगू.

मी जोवर साकारावर प्रेम करतो, तोवर भगवंतालाही आकार घेणे प्राप्त आहे. जे वेदांना शक्य झाले नाही, जिथे वेदांनी ‘ नेति नेति ’ केले, ते परमात्मस्वरूप संतांनी जाणले; म्हणून त्यांनी भगवंताला सगुणात आणले. हा आनंदस्वरूप परमात्मा मिळविण्यासाठी आज आपल्याला सगुणोपासनेची अत्यंत जरूरी आहे. माणसाला जे अत्यंत हितकारक असते, ते शांत आणि आनंदस्वरूप असले पाहिजे. सत्यस्वरूपाची प्राप्ती झाल्याशिवाय ते मिळत नाही; म्हणून भगवंताची प्राप्ती करून घ्यावी. विद्वत्ता अभिमान उत्पन्न करते; म्हणून विद्वत्ता आणि भगवंताची निष्ठा एके ठिकाणी सापडणे कठीण आहे. मीपणाची आणि अभिमानाची पूर्णाहुती देणे, हाच खरा यज्ञ होय. निर्हेतुक कर्म करण्याने खरी सात्त्विकता उत्पन्न होईल, आणि पुढे पूर्णाहुती दिली जाईल. अशा प्रकारे ‘ सर्वस्व ’ अर्पण करणे, हेच यज्ञाचे खरे सार होय. ज्याने स्वतःला ओळखले, त्याने भगवंताला ओळखले. विकारांच्या अधीन न होण्यामध्ये मनुष्याचे खरे मनुष्यपण आहे. भगवंताच्या अधिष्ठानाशिवाय नुसती नीती ही पोरकी असते. ज्यात परमात्म्याचा विसर पडत नाही ती खरी चांगली बुद्धी आणि तो खरा सद्व्यवसाय. देवाचे नाम घ्यावे, नीतिधर्माचे आचरण करावे, प्रेमाने वागावे, आणि लोकांना मदत करावी, यालाच परमार्थ म्हणतात; आणि तो प्रत्येकाने मनापासून करावा.

प्रपंचात जशी आसक्ति असते, तशीच रामचरणी ठेवणे, हीच रामभक्ति होय.

## सुविचार - प्रकाश



प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230

♦ कळीच्या उमलणाऱ्या पाकळ्या
सम बालकांचे हळवे मन उमलुया
प्रेम माया त्यांच्या मनामनात फुलवून
द्वेष मत्सर स्वार्थ नष्ट करूया

♦ घडणाऱ्या प्रत्येक गोष्टी मागील
कार्यकारणभाव समजावून देऊनी
विकसित करावी वैज्ञानिक दृष्टी
विचार प्रयोगातून नवशोध लावूनी

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

पुढे......

ध्रुवाने दुसऱ्या महिन्यात आणखी तीव्र तप केले. 6 -6 दिवसांनी गवताची एक एक काडी, किंवा वाळलेले पान खाल्ले. तिसऱ्या महिन्यानंतर 9- 9 दिवसांनी एक पाण्याचा घोट घेतला.

एकादशी हा तीन दिवसाचा उपवास आहे. दशमीला एक वेळ खायचे संध्याकाळी उपवास. एकादशीला दिवसभर उपवास द्वादशीला सकाळी पारणे फेडणे व संध्याकाळी पुन्हा उपवास.

ध्रुवाला वाटले आपली साधना कमी पडते. हा दोष आपला आहे. चवथ्या महिन्यात 12 12 दिवसांनी फक्त एक श्वास घ्यायचा.5 वा महिना लागला.परमात्मा भेटला नाही आता त्याचे श्वासोश्वास वर नियंत्रण आले. त्याने श्वास बंद केला व ते ही एक पायावर उभे राहून. शरीर दुर्बल झाले.चार महिन्यातील तापामुळे ध्रुवाने श्वास बंद केला की सर्व जगाचा श्वास बंद झाला. सृष्टी नष्ट होण्याची वेळ आली. आता भगवंताला वाटले भेटावे. देवांनी इतरत्र गुहेत जाऊन ध्रुव कुठे आहे हे विचारले. जागोजागी तप करणारे होते ते हजारो वर्षापासून तप करीत होते. सर्वांना तुम्ही हजारो वर्ष पासून तप करता पण ध्रुवाचे तप पहा त्याला मी चार महिन्यात भेटत आहे हे सांगितले. ध्रुवाला देवांनी दर्शन दिले. त्याच्या गालाला त्यांनी आपला शंख लावला की, त्याला सर्व ज्ञान प्राप्त झाले. ध्रुव नंतर घरी परतला. त्यांनी वडीला नंतर 36000 वर्षे राज्य केले. त्याने भगवंताकडे अढळ पद मागितले.वृद्धापकाळात त्याला उपरती झाली. त्याला वाटले भगवंताला आपण ज्ञान, मोक्ष मागायच्या ऐवजी आपण अढळपद मागितले ही मोठीच चूक केली.

वेणा दुष्ट होता त्याला तपाच्या बळावर ऋषींनी केवळ हुंकाराने मारले. त्याच्या शरीराचे मंथन करून पृथू राजाचा जन्म झाला. ते भगवंताचे अंशवतार झाले.ऋषींनी त्यांची स्तुती आधीच केली. ती या साठी की, त्याने असे वागावे.पृथुने अश्वमेध यज्ञ केला.त्याचे कर्तृत्व मोठे होते.भगवंत प्रसन्न झाले माग काय हवे ते असे ते म्हणाले.तो म्हणाला, देवा तुमची स्तुती ऐकण्या साठी मला दहा हजार कान द्या.त्यांनी नंतर पत्नी सहित वनात गमन केले.


शेवटच्या 8 अध्यायात मोक्षाचा विचार आहे.

प्राचीन बर्हीं याने इतके यज्ञ केले होती की, यज्ञ झाल्यावर ती भूमी दर्भाने झाकायची असते. त्याला रिक्त भूमी मिळाली नाही. क्रमशः.....




## जिरा पावडर आणि दूध

ज्योतिर्मय साहित्य



जिरा पावडर आणि दूध एकत्र प्यायल्याने पचन सुधारते, वजन कमी होण्यास मदत होते, झोप चांगली लागते, रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि त्वचेचे आरोग्य सुधारते. हे एक प्रभावी आयुर्वेदिक उपाय आहे, जे तणाव कमी करते आणि शरीराला डिटॉक्सिफाय करण्यास मदत करते.

मुख्य फायदे

पचन सुधारते:

जिऱ्यामुळे पचनक्रिया सुधारते आणि गॅस, ॲसिडिटी यांसारख्या समस्या कमी होतात.

वजन कमी होण्यास मदत:

हे मिश्रण चयापचय वाढवते, ज्यामुळे कॅलरीज बर्न होतात आणि वजन नियंत्रणात राहते.

चांगली झोप:

कोमट जिरे दुधात मिसळल्यास मज्जासंस्था शांत होते, तणाव कमी होतो आणि शांत व गाढ झोप लागते.

रोगप्रतिकारशक्ती वाढवते:

जिऱ्यामध्ये असलेल्या पोषक तत्वामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

त्वचेचे आरोग्य:

हे मिश्रण त्वचेचे आरोग्य सुधारते आणि त्वचा चमकदार बनवते.

शरीर डिटॉक्सिफाय करते:

जिरा शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते, ज्यामुळे शरीर डिटॉक्सिफाय होते.

कसे वापरावे

एक कप कोमट दुधात एक चमचा जिरा पावडर मिसळा आणि झोपण्यापूर्वी प्या.

इतर फायदे

जिरा आणि दुधात कॅल्शियम, पोटॅशियम आणि लोह यांसारखे महत्त्वाचे पोषक घटक असतात.

हे मिश्रण सर्दी-खोकल्यामध्ये देखील फायदेशीर ठरू शकते, कारण यात जिऱ्यामुळे आराम मिळतो.

***



## लघु बोधकथा

♦ मनाचा मोठेपणा

नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यार्थिदशेत असतानाची गोष्ट. अभ्यासात हुशार असणा-या या मुलाकडे त्यांची आई विशेष लक्ष देत असे. एकदा मुलासाठी दूध घेऊन त्या सुभाषचंद्रांच्या अभ्यासिकेत आल्या तेव्हा ते तेथे नव्हते. अचानक हा मुलगा कोठे गेला असेल याचे आईला आश्चर्य वाटले. तितक्यात त्यांना सुभाषच्या टेबलापासून पुस्तकांच्या कपाटापर्यंत मुंग्यांची रांग लागलेली दिसली. इतक्या स्वच्छ खोलीत मुंग्यांची रांग कशामुळे लागली असाही प्रश्न त्यांना पडला. त्यांनी कपाट उघडले तेव्हा त्यात गोड पोळ्या पुस्तकांच्या मागे दडवून ठेवलेल्या दिसल्या. आईने त्या मुंग्या लागलेल्या पोळ्या खिडकीतून बाहेर फेकल्या इतक्यात सुभाष खोलीत आला. त्यांनी आईला विचारले,"तू असे का केलेस आई?" आईने मुंग्यांची रांग दाखवून विचारले की, सुभाष तू या पोळ्या का कपाटात दडवून ठेवल्या आहेस. सुभाषचे डोळे पाणावले व तो म्हणाला," आई, तू पोळ्या फेकल्या हे चांगले केलेस कारण रोजच मी दोन पोळ्या अशा दडवून ठेवत असे. या दोन पोळ्या मी शाळेच्या रस्त्यावर राहणा-या एका गरीब भिकारणीला देत होतो. काल तिची व माझी भेट झाली नाही आणि आताच मला समजले की आज ती मरण पावली. तिला पोळी देऊन मी तिची मदत करत होतो." सुभाषचंद्रांच्या मनातील गरीबांबाबतची उदात्त भावना पाहून आईचेही डोळे भरून आले व तिने सुभाषबाबूंना आपल्या कुशीत घेतले.

तात्पर्य : गरीबांना मदत करणे म्हणजे गरीबांवर उपकार करणे असे नव्हे तर त्यांच्या उपजीविकेपुरते सहाय्य करणे.

# लहानपणीच्या कृष्णधवल आठवणी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आपण नेहमी म्हणतो ना, आमच्या काळात असं होत, तसं होत. असच माझ्या लहानपणी काढलेला हा कृष्णधवल फोटो आहे. आमच गाव छोट होत. गावात फोटो स्टुडिओ नव्हता. असच कधीतरी कुणाकडे लग्नप्रसंग किंवा इतर कोठला तरी मोठा कार्यक्रम असेल तर फोटोग्राफर यायचा व फोटो काढले जायचे. असेच एके दिवशी आमचे शेजारी श्री. वसंतराव कुळकर्णी यांचे कडे एक फोटोग्राफर आला होता. आम्हाला चाहूल लागली. मग काय, ही बातमी आम्ही घरात सर्वांना सांगितली व हट्टच केला की आपल्याला फोटो काढायचाच.मग आई वडिलांनी परवानगी दिली. फोटोग्राफर आला.फोटो तर काढायचा



परंतु बसायला खुर्च्या तरी कुठे होत्या. शेवटी शेजारी वकील साहेबाकडून दोन खुर्च्या आणल्या. फोटोग्राफर ने आम्हाला व्यवस्थित बसविले. कोण कुठे बसायचे यावर थोडा वाद झाला. माझा लहान भाऊ वडिलांसोबत होता, कदाचित मला त्यांचे जवळ बसायचे असेल, त्यामुळे मला राग आला. मी म्हणालो जाऊ द्या, मला फोटोच काढायचा नाही. मग कसेतरी विनवणी केल्यावर मी तयार झालो. परंतु मला आलेला राग माझ्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत आहे. फोटोकॉपी मिळाली. फोटो फ्रेम करण्यात आला. नंतर आल्या-गेल्या सर्वांनाच तो फोटो दाखविला जायचा. फोटो कृष्णधवलच होता,परंतु किती-किती म्हणून त्याच कौतुक होत होत.नाहीतर आजकाल मोबाईल आल्यापासून उठता-बसता फोटो काढतात, उत्सव असो वा नसो आणि लग्न प्रसंगी तर त्याला सीमाच नाही. असो. आजही आम्ही जेंव्हा एकत्र जमतो, तेंव्हा हा फोटो पाहून आम्हाला खुप हसायला येतंय व या फोटोच्या माध्यमातून जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. या स्मृति चित्रातील आमच्या आई वडिलांचा रुबाबदार चेहरा, मोठ्या भावाचा टोपी घातलेला फोटो व त्याचे हावभाव, मोठ्या बहिणीचा निरागस तर लहान बहिणीचा अल्लड चेहरा, वडिलांसोबत ऐटीत बसलेला माझा लहान भाऊ व माझ्या चेहऱ्यावरील नाराजी स्पष्ट पणे जाणवते. असं हे आमच्या आईवडिलांचे व बहिणभावंडाचे स्मृतिचित्र खुप काही सांगून जाते.

***

✍️ **प्रमोद दसरे, पुणे**
**मो. 98501 83909**



## नि:शुल्क संगणक प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

लवळे ता. मुळसी – पीएमश्री जि.प. प्राथमिक शाळा लवळे येथे श्री.अशोकजी नवाल सर– नि:शुल्क संगणक प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन पुण्याचे समाजसेवक व सुप्रसिध्द रस्ते मार्ग बांधकाम व्यवसायिक श्री. सुशिल जी अग्रवाल यांच्या शुभहस्ते व श्री. दयानंद चिकलकर, डॉ.गजानन राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. श्रीभगवती सेवा आश्रम व जीवन कौशल्ये विकास, बाणेर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम संपन्न झाला. लवळे येथील ६२४ विद्यार्थी संख्या व १६ शिक्षकाची संख्या असलेली आदर्श शाळेत संजय देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली चैतन्य सॉफ्टवेअर टेक्नॉलाजी, डेक्कन, पुणे यांच्या सौजन्याने शालेय मुला मुलीचे स्किल डेव्हलपमेंट प्रकल्प राबवल्या जातो. त्यात प्रामुख्याने बालवयात विद्युततंत्र कौशल्ये, प्लबिंग कौशल्ये, रोबोट निर्मिती, इलेक्ट्रोनिक उपकरण खेळणी निर्मिती,मेंदी रेखाटन कला ई. कार्यक्रम हाती घेतले जातात. तसेच शाळेच्या भव्य प्रांगणात फळे, फुले, भाजी बागकाम, वृक्षारोपण इ. प्रशिक्षण देण्यात येते. जि.प. व शिक्षण संचालनालय मार्फत विविध कार्यक्रमात सहभागी असलेल्या लवळे शाळेस अनेक पूरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे ! संयोजक गिरीधर भाई राठी, डॉ.श्याम कुलकर्णी, प्रकाश दादा बोकील, श्रीरंग कूर्हे, शालेय समितीचे शिक्षण प्रतिनिधी संजय–आबा सातव, व्यवस्थापन समितीचे अमोल क्षीरसागर यांची उपस्थिती लाभलेली होती.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे आदर्श मुख्याध्यापिका नंदाताई खोमणे मॅडम, शुभांगी भालेराव, माधवराव शिंदे, बापुराव पवार संपूर्ण गुरुजन संच यांनी प्रयत्न केले.

# करवंद (डोंगरची काळी मैना)

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

दुपारच्या जेवणानंतर डुलकी घ्यावी म्हणून मी सोफ्यावरच अंग टाकलं. इतक्यात, ''घ्या, डोंगरची काळी मैना,'' अशी आरोळी ऐकू आली आणि मी उठून गॅलरीत आले. टोपलीत करवंद विकणारी बारा –चौदा वर्षाची मुलगी मला दिसली. ''अग थांब,!'' मी तिला थांबवले. पैसे हातात घेऊन भराभर पायऱ्या उतरून खाली आले, तोपर्यंत ती उन्हातच उभी होती! मी तिच्या टोपलीत डोकावत म्हणाले, ''बघू जरा कशी आहेत?''पळसाच्या पानांच्या कोनामध्ये ठेवलेली करवंद पाहताच तोंडाला पाणी सुटले, काळीभोर ,रसरशीत एकमेकांना चिटकलेली आंबट गोड, काहीशी सुकलेली करवंद, कशी देशील? मी भाव विचारला. ''वीस रुपयाला एक'' ती टोपलीकडे बघत म्हणाली, मी दोन कोन घेतले. तिला पैसे दिले, तिच्या घामाळलेल्या निरागस चेहऱ्यावर हसू उमटले. ''पाणी घे ना गं,''

मी तिला आग्रह केला, ''नको बाटलीत पाणी आहे माझ्याजवळ.''



कदाचित मी अनोळखी असल्याने तिला संकोच वाटला. ती परत, ''घ्या,,, डोंगरची काळी मैना,'' अशी आरोळी देत निघून गेली.


मी मात्र बालपणात केव्हाच पोहोचले होते. डोंगर रांगेत असलेलं माझं छोटसं गाव मला आठवून गेलं. तिथल्या डोंगर आणि खोऱ्या करवंदीच्या, सागरगोट्याच्या, चिल्लारीच्या जाळ्यांनी वेढलेल्या होत्या, चारोळीची टेंभरांची दाट झाडे होती. उन्हाळ्यामध्ये हा सगळा रानमेवा आम्हाला खुणावत असे. त्यात करवंद माझी आवडती! काटेरी जाळी आणि अडचणीत ही फळ येतात त्यामुळे हा रानमेवा खाऊ घालायला माझे बाबा कायम आमच्या सोबत येत असत. आम्ही भावंड बाबासोबत रविवारी किंवा परीक्षा संपल्यावर उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू झाल्या की करवंद खायला डोंगरात जात असू. रस्त्याने चालताना ऊन लागू नये म्हणून बाबा पळसाच्या डहाळ्या तोडून देत, त्या डोक्यावर छत्री सारख्या धरून आम्ही त्यांच्या मागे मागे चालत असू.

डोंगरात गेलं की बाबा आम्हा भावंडांना एका झाडाखाली बसून ठेवत. आणि पळसाच्या पानांमध्ये पिकलेली रसरशीत करवंद तोडून देत. आम्ही मिटक्या मारत खात असु.

काळ बदलला,,आम्ही भावंड आपापल्या संसारात रमलो. बाबा खुप लवकर आम्हाला पोरक करून गेले. बाबा गेले अन् सगळ सुन– सुन झाल, तो डोंगरही उघडाबोडखा झाला,, पळसाच्या पानात ठेवलेल्या त्या करवंदांचा सुवास मी हृदयात भरून घेतला.

बाबा डोळ्यासमोरून हटत नव्हते, सावलीत बसवणारे, पळसाची डहाळी डोक्यावर धरणारे, काट्यांमधून करवंद तोडून मला खाऊ घालणारे, माझे बाबा,! मी करवंद खाल्ले, आणि माझा गळा दाटून आला,! ते सुकलेल पळसाच पान मी हृदयाजवळ घेतल आणि अश्रूंना वाट मोकळी करून दिली..!




## एकांकिका
# मायेचा ओलावा



**✍️लेखक - अरुण वि.देशपांडे, पुणे, मोबाईल- 9850177342**

कालच्या अंकावरून पुढे......

■ भाई- शाळा म्हटल्यावर हेच तर असतं, तिथे टाईमपास करण्यासाठी जातात का ?

■ दीदी- ए दीड शहाण्या मुला, ते मला नीट माहिती आहे,

■ भाई- हो ना, मग, शाळा, अभ्यास, हे तर करतेसच, पण बाकीच्या वेळेतली घरातली कामे, याचा तुला कंटाळा, हे मला माहिती आहे त्याचे काय ? (नेहमीच्या सवयीप्रमाणे दिदीचा आवाज वरच्या पट्टीत जाऊ लागतो, )

■ दीदी- भाई, उगाचच मला खिजवू नकोस हं. आधीच मी शाळेतून थकून येते. काही करणे नको वाटते, त्यात तू मला असे टोमणे मारतोस,

■ भाई- (दिदीच्या रागा कडे सरळ दुर्लक्ष करीत बोलत रहातो) दिदी आपण एकाच शाळेत आहोत, एकाच बसमधून आपण शाळेची ये- जा करतो, हे नको विसरुस

■ दिदी- हो ना, काय करू, माझ्या हातात नाहीये काही, रोज नजरेसमोर असतोस माझ्या, असा राग येतो मला, पण राग गिळून गप्प बसते

■ भाई- हे बघ दिदी, भाऊ म्हणून तुझ्यावर लक्ष ठेवणे कामच आहे माझे, आय एम अलर्ट अल्वेज !

■ दिदी- भाई, एक तर तू आईचा चमचा आहे, फुल्ल चमचेगिरी करीत असतो,

■ भाई- तू काही म्हटले तरी, मला काही फरक पडत नाही.

■ दिदी- याचा सगळा हिशेब मी करीन तेव्हा बघ, तुझी हालत कशी होईल ते !

■ भाई- दिदी, मी लहान होतो तेव्हाची गोष्ट वेगळी होती, तुझ्यापेक्ष लहान नक्कीच आहे मी, पण आता वयाने तर मोठा झालोय ना !

■ दिदी- (अधिकच संतापते) भाई, तू जास्तच आगाऊपणा करायला लागलास, आईला सारे डिटेल रिपोर्ट देतोस, आईचा ओरडा खावा लागतो मला, तुला काय वाटलं, मला कळत नाही का हे ?

■ भाई- सगळ्यांना माहिती आहे तू माझी मोठी बहीण आहेस.

■ दिदी- माझे नशीबच धड नाही, नको तिथं तू कडमडतोस, माझ्या फ्रेंड हसत मला म्हणतात- ए स्वानंदी, हा तुझा भाऊ ? तू किती स्मार्ट, आणि हा..

■ भाई- मी जन्मजात असा आहे, माझ्या हातात थोडंच आहे दिसणे वगैरे, लहानपणापासून मी किडक-मिडकाच आहे, काही करा किती खा, प्या, लुकडा लुकडाच रहातो.

■ दिदी- त्यात तुला ड्रेस सेन्स कमी, बावळटपणा भरलाय तुझ्यात माझ्या चॉईसप्रमाणे राहून बघ, नाईस लुकिंग बॉय होशील.

■ भाई- दिदी - मला माझ्या अशा दिसण्याची, असण्याची, अजिबात लाज वाटत नाही, जाड भिंगाचा चष्मा आहे मला, माझ्या दोन्ही डोळ्यात दृष्टी- दोष आहे.

■ दिदी- ( कुजकट हसते) भाई, आपण सोबत दिसलो की, माझे फ्रेंड माझ्याकडे पाहून हसतात , मला इरिटेट करतात

■ भाई- तू आणि तुझ्या अशा फ्रेंड्स ज्यांचा कॉमन लोकांशी संबंध नाहीये, म्हणून त्या मला हसतात,

■ दिदी- भाई, बराच बोलतोस तू, घुम्या सारखा वाटणारा, मलाच नॉलेज शिकवतोस, लिमिट मध्ये रहा बाळा ।

■ भाई- मला माहिती आहे, तुला तुझ्याशिवाय दुसरं कुणी आवडत नाही, तुझ्या नावडत्या लिस्टमध्ये टॉपवर मीच आहे ,

■ दिदी- यस भाई, तुझा स्वभाव, सवयी, आवडी - निवडी काहीच मॅच होत नाही.

■ भाई- लहानपणीची तू हट्टी, हेकेखोर , आता मोठी झालीस तरी जशीच्या तशी आहेस,

■ दिदी- लकी समज तू स्वतःला, तिसरी - चौथीतपर्यंत माझ्या हातचे फटके खात खात तू मोठा झालास,

भाई- दिदी, मारकुटी बहीण, आता भांडखोर बहीण झालीय बाकी तुझ्यात काही बदल नाही.

पुढे उद्याच्या अंकात........

# ✍️ओळख साहित्यिकांची



## दत्तात्रय शिवशंकर तरलगट्टी

♦जन्मतारीख : ०२-०७-१९६४

♦शैक्षणिक अर्हता : बी.ए., बी.एड्., डी.एस्.एम्. व्यवसाय विज्ञ. वृत्तपत्र विद्या पदविका.

♦शैक्षणिक सेवा : १)चंडक हायस्कूल, सोलापूर. २)जवाहर विद्यालय, घेरडी, ३)गौतम विद्यालय, पंढरपूर, ४)कवठेकर प्रशाला, व द.ह.कवठेकर प्रशाला, पंढरपूर येथून मुख्याध्यापक म्हणून ३१-५-२१ रोजी सेवानिवृत्त. एकूण ३५ वर्षे सेवाकाल. या कार्यकाळात एक विद्यार्थी प्रिय शिक्षक हीच ओळख प्राप्त केली. चार न्यायाधीश, एकदोन आयपीएस, चार पाच पीएस्आय, कैक डॉक्टर्स व वकील विद्यार्थी झाले. पण सर मी शिक्षक झालो असे म्हणणारा विद्यार्थी जवळचा वाटतो. विद्यार्थ्यांना कुलदैवत मानले, त्याचे फळ मिळालेच. पण पुढच्या जन्मीही देवाने शिक्षकच करावे हेच त्या शारदे पुढे मागणे !

♦उल्लेखनीय कार्य : १) म.रा.शै.सं.संस्था, पुणे यांच्या लोकसंख्या शिक्षण विभागाच्या शिक्षक हस्तपुस्तक संपादन मंडळ सहभाग.
२) माजी अध्यक्ष शिक्षक परिषद पंढरपूर शहर...
३) सलग तीन वर्षे इंग्रजी तज्ज्ञ मार्गदर्शक स्मार्ट पीटी मध्ये उत्कृष्ठ तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते गौरव.
४) वै.दा.का.थावरे यांच्या मंडळाने घेतलेल्या श्री ज्ञानेश्वरी हस्तलिखित लेखन कार्य.
५) सध्या श्री.तुकाराम गाथा लेखन सुरू आहे.
६) आनंदनगर टाकळीरोड येथे विघ्नहर्ता गणेश मंदिर निर्माण व परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन स्वतः केले आहे.
७) मा.पंच अहिल्याबाई मंदिर ट्रस्ट.
८) विविध शाळात व्याख्याने.
९) आजीव सदस्य, पंढरपूर वृत्तपत्र लेखक मंच.
१०)बालकवी संमेलन प्रशालेत आयोजन व दोन विद्यार्थांचे काव्यसंग्रह निर्मिती.
११) किशोर या बालभारती मंडळाच्या मासिकात बाल साहित्य प्रसिध्द.
१२) अधुनिक केसरी व ज्योतिर्मय तसेच पंढरपूर च्या पंढरी भूषण व पंढरी संचार मध्ये लेख कविता प्रसिद्ध अनेक वेळा प्रसिध्द.
१३) एसएस्सी मेरिटलिस्ट मध्ये दोन विद्यार्थी (इतिहास)

♦समाजसेवा म्हणून मोफत वधु वर मेळाव्याचे आयोजन.

♦राष्ट्रीय कार्य : १)३०वर्षाच्या सलग सेवेत तीन वेळा भारतीय जनगणना कार्यक्रमात सहभाग.
२) होमगार्ड संघटनेत होमगार्ड म्हणून(नंबर यु ५४०) ६वर्षे निष्काम सेवा. विविध बंदोबस्तात सहभागी. ३) मतदान केंद्राध्यक्ष लोकसभा, विधानसभा व न.पा.निवडणूक व सहकारी साखर कारखाना निवडणूक. ४) शिक्षकदिनी रक्तदान शिबीर आयोजन करुन काही वेळा रक्तदान.

♦वृत्तपत्र/पत्र लेखन शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, स्फूट लेख विविध दैनिकात व दिवाळी अंकात प्रसिद्ध.

♦पाक्षिक प्रात:स्मरणीय हे स्वतः संपादक म्हणून दोन वर्षे वृत्तपत्र चालविले.

♦दै.सकाळ, लोकमत,संचार मध्ये वाचक पत्रव्यवहार मधून सामाजिक प्रश्न मांडले.

♦साहित्यिक वाटचाल : १) पंढरीचे मानबिंदू हे पुस्तक प्रसिद्ध.

♦ र ला र अन् ट ला ट हा काव्यसंग्रह प्रसिद्ध

♦ वेध तिच्या मौनाचा हा ललित लेख पुस्तक प्रसिद्ध.

♦ पंढरीचे ज्ञात अज्ञात हिरे* हे चौथे साहित्य पुष्प

♦चांदवा हा बाल काव्यसंग्रह ही प्रकाशनाच्या मार्गावर.

पुरस्कार न मागता दोन मिळाले. हल्लीचे पुरस्कार नको वाटतात.

♦निवासस्थान पत्ता : "पसायदान" प्लॉट नंबर ६७ विघ्नहर्ता गणेश मंदिर जवळ, आनंदनगर टाकळीरोड, पंढरपूर. जि.सोलापूर.
भ्रमणध्वनी..9881629048.

# सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे




## ♦कर्मण्येवाधिकारस्से मा फलेषु कदाचन...

महाभारतातील कौरव व पान्डव युध्दाचा हा प्रसंग आहे. हे युद्ध आता अटल आहे, हे श्री कृष्णाला समजल्यावर प्रत्यक्ष रणभूमीवर दोन्ही बाजूंनी सैन्य आणि विर तयार झाले. कुरूक्षेत्रावर संहार होणार हे पाहून पार्थ दुःखी कष्टी झाला. तो म्हणतो
हे श्रीकृष्णा मी माझ्या आप्त स्वकिय गुरूजनाना मारून पाप करत आहे, तेव्हा कृष्णाने हे वचन सांगून त्याला उपदेश केला. तोच कृष्ण कान्हा, राधे
चा कन्हैया, रासक्रीडा करणार द्वारकानाथ, नंद यशोदेचा बाल पांडवाचा कैवारी होऊन सारथी झाला. आपल्या आज जीवनातही गीता ऊपयोगी आहे. "आपण एखादे असे काम करतो,आपली स्तुति होते, प्रशंसा होते, तेव्हा हे फल लगेच ईश्वर चरणी अर्पण करा, आपण अनेक गोष्टी आधीच ठरवितो, पण प्रत्यक्षात बाहेरचे वास्तव वेगवेगळे असते, ईश्वरी इच्छा मानून आपले कार्य करत राहाव, आणि चांगले परिणाम घ्या . म्हणून या गीता वचनात असा संदेश दिला आहे की,
माणूस कोणताही असो, स्री पुरूष असो.. परिणाम वा फलाची अपेक्षा न काळजी न करता.. तुमचे लक्ष फक्त काम कर्तव्य मनापासून करत राहावे. हाच पुढे जाण्याचा प्रगतीचा मार्ग आहे आज एवढे पुरे गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग, काळजी घ्या. स्वस्थ राहा मस्त राहा.


# ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्ड्स् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

# दत्तनामी रंगलेले - कवी सुधांशु

**ज्योतिर्मय साहित्य**

''काव्यतीर्थ'' कवी सुधांशु - हणमंत नरहर जोशी, जन्म ६ एप्रिल, इ.स. १९१७, औदुंबर, सांगली जिल्हा, महाराष्ट्र. हे मराठी भाषेतील कवी होते. त्यांनी अनेक मराठी भावगीते लिहिली आहेत. मराठी कवी कुंजविहारी यांनी हणमंत जोशींना ''सुधांशु'' हे नाव दिले, आणि पुढे त्याच नावाने ते ओळखले जाऊ लागले.

इ.स. १९३७पासून सुधांशु यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. त्यांच्या कविता किर्लोस्कर, स्त्री, मनोहर आदी मासिकांतून प्रसिद्ध होत होत्या. या कवितांचे पुढे पुस्तकरूपाने संग्रह झाले. सुधांशुंना एकदा रा.अ. कुंभोजकर यांनी 'तुम्ही कवी कसे झालात?' असे विचारले. त्यावर ते म्हणाले, 'मी दोन मातांच्यामुळे कवी झालो''. एक माझी जन्मदात्रीमाऊली आणि दुसरी कृष्णामाई. एकीने माझ्या अंतःकरणात कवितेची बीजे रुजवली आणि दुसरीने आपल्या निर्मलतेने आणि समृद्धीने मला काव्यदृष्टी दिली.'

कवी सुधांशू यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील औदुंबर येथील त्यामुळे कृष्णा नदीच्या काठावर वसलेल्या या पवित्र भूमीतील निसर्गरम्य वातावरणाने त्यांच्यावर लहानपणापासूनच संस्कार केले. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले होते, परंतु त्यांना शब्दप्रतिभा उपजत होती.

कवी सुधांशू यांनी प्रामुख्याने भावगीते, भक्तीगीते आणि मुलांसाठी कविता लिहिल्यात. मानवी मनातील हळवे कोपरे उलगडणारी त्यांची भावगीते आजही तितकीच लोकप्रिय आहेत. औदुंबर हे दत्तक्षेत्र असल्याने त्यांच्या लेखनावर दत्तभक्तीचा मोठा प्रभाव होता. त्यांनी लिहिलेली अनेक दत्तभजने आजही घरोघरी गायली जातात. त्यांच्या कवितांत कृष्णा नदीचा काठ, तेथील झाडे-वेली आणि शांतता यांचे सुंदर प्रतिबिंब आढळते. त्यांच्या काही महत्त्वाच्या रचना... इथेच आणि या बांधावर अशीच श्यामल वेळ - हे त्यांचे सर्वाधिक गाजलेले अजरामर भावगीत आहे. दत्तदिगंबर दैवत माझे - एक लोकप्रिय भक्तीगीत.

गोकुळाला वेड लाविले....
देव माझा विठू सावळा.....
चंदनाची वीणा: हा त्यांचा




अत्यंत लोकप्रिय भावगीत संग्रह आहे.

भक्तीचे चांदणे: हा भक्ती आणि भावगीतांचा गाजलेला संग्रह मानला जातो.

दत्तगीते (१९५८) हा भगवान दत्तात्रेयांवरील भक्तिपर गीतांचा संग्रह. गीत दत्तात्रेय (१९६५) आध्यात्मिक विषयावरील दत्तगुरुंची सुंदर गाणी (१९७९), दत्तभक्तीवर आधारित गीतांचा संग्रह.

खडकातले झरे (१९५१), हा त्यांचा एकमेव कथासंग्रह असून यात त्यांनी कथाकार म्हणून आपली प्रतिभा दाखवून दिली आहे.

त्यांनी लहान मुलांसाठी काही बालकथा आणि थोर संतांवर आधारित संतचरित्रे देखील लिहिली आहेत. त्यांच्या कवितांचे आणि विचारांचे संकलन सुधांशू - दर्शन या नावाने उपलब्ध आहे.

त्यांचे संपादित कवितासंग्रह कौमुदी (१९४०) गीतदत्तात्रय, गीतदत्तात्रयाचे संस्कृत भाषांतर, गीतसुगंध, गीत सुवर्ण, गीतसुधा, गीत सुषमा, जलवंती (१९५८), झोपाळा, दत्तगुरूंची गाणी, भावसुधा (१९७३), यात्री, विजयिनी (१९५०), श्री दत्त गीते, सुंदर कालिंदीकाठी, तर गद्य लेखनात संपादित खडकातील झरे (कथासंग्रह), चतुरादेवी (बालवाङ्मय), दत्तजन्म (एकांकिका), सुभाषकथा (बालवाङ्मय),

गाजलेली गीते संपादीत.. इथेच आणि या बांधावर, गुरुदत्त पाहिले कृष्णातिरी, गोकुळाला वेड लाविले, दत्तगुरू सुखधाम, दत्त दिगंबर दैवत माझे, दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा, देव माझा विठू सावळा, प्रभू या हो, भुकेला भक्तीला भगवान, भुलविलेस साजणी, मनी माझिया नटले गोकुळ, माझ्या मनात विणिते नाव, या धुंद चांदण्यात तू, या मुरलीने कौतुक केले, रुद्राक्षांच्या नकोत




माळा,स्मरा स्मरा हो, हिरवे पिवळे तुरे उन्हाचे.

सुधांशूंच्या गीतदत्तात्रयाचे कार्यक्रम श्रीक्षेत्र औदुंबर येथे पहिल्यांदा, नंतर मिरजेच्या अण्णाबुवा मठात आणि नंतर इतर अनेक ठिकाणी झाले. भारत गायन समाजात आणि नंतर अन्यत्र पुण्यात झालेल्या कार्यक्रमांना मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर, श्री मारुलकरबुवा, संजीवनी खेर आदी संगीतज्ज्ञांबरोबरच पंडित महादेवशास्त्री जोशी, भा. द. खेर, सरदार आबासाहेब मुजुमदार यांसारख्या रसिक साहित्यिकांची उपस्थिती होती. या दत्तगीतांचे गायक सांगलीचेच बाळ कारंजकर होते. तबल्याची साथ रामभाऊ चिपळूणकरांनी केली होती.

कवी सुधांशु यांनी आयुष्यभर खादीचे कपडे घातले. त्यांच्या अंगावर सतत एक शाल असे. सुधांशूंनी भारताच्या १९४२ सालच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता. आपल्या स्वातंत्र्यगीतांतून आणि पोवाड्यांतून त्यांनी स्वातंत्रसैनिकांना स्फूर्ती दिली.

त्यांच्या घरी काही भूमिगत स्वातंत्र्यसैनिक एकदोन दिवसांसाठी गुप्तपणे मुक्कामासाठी राहून जात. गावकऱ्यांच्या कवी सुधांशूंवर असलेल्या अतूट प्रेमामुळे ही बातमी पोलिसांपर्यंत कधीच पोहोचली नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी स्वतःला ग्रामसुधारणेला वाहून घेतले. इ.स.१९६० मध्ये ते अंकलखोप या गावाचे सरपंच म्हणून बिनविरोध निवडून आले आणि १९६५पर्यंत त्या पदावर राहिले. त्याच सुमाराला गावाला स्वच्छतेचा आणि व्यसनमुक्तीचा पुरस्कारही मिळाला. कवि सुधांशु दत्ताचे पुजारी होते आणि ते पौरोहित्यही करीत. औदुंबर येथे सदानंद साहित्य मंडळाची स्थापना करून कवी सुधांशूंनी १९३९पासून सदानंद साहित्य संमेलन भरविण्यास सुरुवात केली. दरवर्षी होणाऱ्या या सदानंद साहित्य संमेलनाला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील साहित्यरसिक येतात. १८ सप्टेंबर, इ.स. २००६ ला कवि सुधांशु यांचे निधन झाले. त्यांच्या प्रदीर्घ साहित्य सेवेसाठी त्यांना भारत सरकारकडून पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. तसेच त्यांना काव्यतीर्थ ही पदवीही प्रदान करण्यात आली होती. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ औदुंबर येथे दरवर्षी प्रतिभावंत कवींचे संमेलन भरवले जाते, ज्याला अखिल भारतीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलन म्हणूनही ओळखले जाते.

# मराठवाड्यात गणोरीतील विद्यार्थ्यांना एआयचे धडे

## राज्यातील पहिल्या तीन 'एआय' प्रयोगशाळांची घोषणा, गाव परिसरात कौतुक

**ज्योतिर्मय साहित्य**

फुलंब्री- महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या 'महाएआय मिशन' अंतर्गत राज्यातील पहिल्या तीन 'एआय' प्रयोगशाळांची घोषणा झाली. मराठवाडा विभागातून फुलंब्री तालुक्यातील गणोरी येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्रशालेची एकमेव शाळा म्हणून निवड झाली. ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरी विद्यार्थ्यांच्या तोडीचे आधुनिक तंत्रज्ञान शिकण्याचा मार्ग मोकळा झाला.

महाराष्ट्र राज्य देशाला 'एआय हब' म्हणून विकसित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. प्रायोगिक तत्त्वावर राज्यातील तीन शाळांची निवड झाली. यात गणोरी, उमरेड, मावळ येथील शाळांचा समावेश आहे. शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी परिपत्रक जारी केले. सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये हा राज्यातील पहिलाच अभिनव प्रयोग ठरणार आहे.

२० ऑक्टोबर २०२५ रोजी शालेय शिक्षण




विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल आणि एचपी इंडिया यांच्यात सामंजस्य करार झाला. प्रकल्पाची अंमलबजावणी 'लर्निंग लिंक्स' संस्थेमार्फत होणार आहे. एचपी फाउंडेशनचे नवीन चावला आणि लर्निंग लिंक्सच्या प्रतिनिधींनी गणोरी जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन पाहणी केली. प्रयोगशाळेचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थी येथे प्रत्यक्ष शिक्षण घेऊ शकणार आहेत. येत्या पाच वर्षांत राज्यातील सुमारे तीन लाख विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेची पायाभूत ओळख करून देण्याचे उद्दिष्ट आहे. गणोरी शाळेत मशीन लर्निंग, डेटा विश्लेषण, कोडिंग हे विषय शालेय स्तरावर शिकवले जाणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार करण्याची क्षमता वाढणार आहे. भविष्यातील तंत्रज्ञानावर आधारित नोकऱ्यांसाठी त्यांना तयार केले जाणार आहे.

मुख्याध्यापक जिल्हा शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी ही निवड अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. मुख्याध्यापक अनिल प्र. देशमुख यांनी निवड आनंदाची असून जबाबदारी वाढवणारी असल्याचे म्हटले. विभागीय परीक्षा मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे, शिक्षण उपसंचालक कैलास दातखीळ, शिक्षण सहसंचालक रवींद्र वाणी, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, गटशिक्षणाधिकारी क्रांती धसवाडीकर, विस्तार अधिकारी दिलीप शिरसाठ, राजेश महाजन यांनी शाळेचे अभिनंदन केले.

# बिनाका गीत माला-अजरामर संगीत मालिका

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

आशियातील पहिला रेडिओ प्रसारक म्हणून मानल्या गेलेल्या आणि १९४९ नंतर रेडिओ सिलोन नावाने अधिक संघटीत, व्यावसायिक तसेच प्रादेशिक प्रभाव असलेला माध्यमकेंद्राने या सेंटरवरचे कार्यक्रम भारतातही ऐकण्यास सहज येत असल्याने ३० मार्च १९५१ पासून रेडिओ हिंदीची सर्विस सुरू केली.

हिंदी चित्रपटातील गाणी श्रीलंकेच्या रेडिओ स्टेशनवरून रसिकांच्या कानावर पडू लागली. विशेष म्हणजे भारतातल्या ऑल इंडिया रेडिओ स्टेशनपेक्षासुद्धा जादा प्रमाणात अगदी स्पष्टपणे आवाज आणि गाणी ऐकायला मिळत असल्याने मोठा श्रोतुवर्ग सिलोन रेडिओ ला मिळाला. नुसत्या भारतातच नव्हे तर पाकिस्तान, अफगाणिस्तान, मिडल ईस्ट पर्यंत चांगल्या आवाजात सर्व कार्यक्रम ऐकायला मिळत असत. अल्पावधीतच सिलोन रेडिओ स्टेशन लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचले. भूमी श्रीलंकेची, ट्रान्समीटर ब्रिटिशकालीन आणि रसिकजन भारतीय असा काळाने करिश्मा दाखविला. या रेडिओ स्टेशनच्या लोकप्रियतेमुळे ऑल इंडिया रेडिओला श्रोते मिळेनासे झाले त्यामुळे भारत सरकारने चित्रपट संगीतावरील




बंदी उठवून १९५७ मध्ये विविध भारती





ही सेवा सुरू केली. १९५२ पासून रेडिओ सिलोनवर हिंदी चित्रपटगीतांच्या प्रसारामुळे तसेच बिनाका गीतमाला प्रसारणामुळे आणि व्यावसायिक प्रसारण, जिंगल्स, बहुभाषिक कार्यक्रमामुळे मोठा श्रोता वर्ग या स्टेशनमुळे तयार झाला. युद्धकाळातील कोलंबो रेडिओ स्टेशनकडून मिळालेली तांत्रिक क्षमता, शक्तिशाली शॉर्ट वेव्ह प्रसारण आणि दक्षिण आशियाभर पोहोचणारी सिग्नल शक्ती यामुळे सिलोन रेडिओ केंद्र केवळ स्थानिक नव्हे तर सीमापार प्रभाव असलेले स्टेशन बनले. त्यामुळे १९५० ते १९८ च्या दशकापर्यंत दक्षिण आशियाई रसिकांची लोकप्रिय सांस्कृतिक संस्कृती घडविण्यात रेडिओ सिलोन ची भूमिका निर्णायक होती.

या स्टेशनवरील कार्यक्रमामुळे गायक, संगीतकार, गीतकार आणि चित्रपटांचे प्रमोशन यासाठी नवे व्यासपीठ मिळाले. अनेक श्रोते गाण्यांच्या लोकप्रियतेकडे ''पायदान'' म्हणून पाहू लागले. त्याकाळात चित्रपटाचे यशाचे मोजमाप बिनाका गीतमाला च्या गाण्यांवर ठरे असे म्हंटल्यास वावगे ठरणार नाही. बिनाका गीतमाला १९८८ मध्ये रेडिओ सिलोनवर थांबली आणि १९९४ मध्ये पूर्णपणे संपली. रेडिओ सिलोन वरून १९५२ ते १९८८ चालू असलेला बिनाका गीतमाला कार्यक्रम टीव्हीच्या उदयामुळे कमी लोकप्रिय झाला. सॅटेलाइट टीव्हीवर सुपरहिट मुकाबला यासारखे गाण्यांचे काउंटडाऊन शो लोकप्रिय झाले. ज्यामुळे रेडिओचे श्रोते कमी झाले. टीव्हीच्या लोकप्रियतेमुळे रेडीओवरच्या कार्यक्रमाची लोकप्रियता घसरली. १९९० च्या दशकात टी.व्ही. आणि केबल चॅनेल्सने रेडिओचे वर्चस्व संपवले. ४२ वर्षाची बिनाका गीतमालेची यशस्वी सफर संपुष्टात आली. २० व्या शतकात १९७० पर्यंतची भारतात जन्मलेली पिढी सिलोन स्टेशन आणि बिनाका गीतमाला विसरू शकत नाही. सांस्कृतिक भरण-पोषण दक्षिण आशियामधील सर्व श्रोतुवर्गाचे सिलोन स्टेशनं मुळे झाले हे निश्चित.

बिनाका गीतमालेच्या लाटांनी,
हिंदी सुरांनी दिले सांस्कृतिक पोषण.
रेडिओ सिलोनवर घुमले मधुर धुन,
श्रोत्यांच्या हृदयात रंगले संस्कृतीचे रंग.
पायदानांची उत्सुकता, भावना जोडल्या,
पिढ्या एकत्र बांधल्या गीतांच्या जाळ्यात.
भाइयों-बहनोंच्या बोलांत उत्साहाची धमाल,
अमिट वारसा दिला लोकप्रिय संगीताने.

# महात्मा जोतिबा फुले - सामाजिक परिवर्तनाचा दीपस्तंभ

**ज्योतिर्मय साहित्य**



भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की त्यांनी केवळ आपल्या काळालाच नव्हे तर पुढील अनेक पिढ्यांनाही दिशा दिली. अशा महान समाजसुधारकांमध्ये महात्मा जोतिराव फुले यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी शिक्षण, स्त्री-मुक्ती, जातिव्यवस्था निर्मूलन आणि सामाजिक समतेसाठी आयुष्यभर संघर्ष केला. म्हणूनच त्यांना ''सामाजिक क्रांतीचे जनक'' असेही संबोधले जाते.

महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी महाराष्ट्रातील पुणे येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव जोतिराव गोविंदराव फुले असे होते. त्यांचे कुटुंब माळी समाजातील होते. त्या काळात समाजात जातीभेद खूप तीव्र होता. अशा परिस्थितीत ज्योतिरावांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले आणि समाजातील सर्व घटकांना शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न सुरू केले.




महात्मा फुले यांच्या आयुष्यातील सर्वात मोठे कार्य म्हणजे स्त्री शिक्षणाची सुरुवात. त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले आणि १८४८ साली पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्या काळात मुलींना शिक्षण देणे पाप समजले जात होते. समाजातील अनेक लोकांनी त्यांना विरोध केला, शिवीगाळ केली, पण महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांनी धैर्याने आपले कार्य सुरू ठेवले. आज स्त्रियांच्या शिक्षणामागे आणि प्रगतीमागे या दांपत्याचा मोठा वाटा आहे.

महात्मा फुले यांनी केवळ स्त्री शिक्षणच नव्हे तर अस्पृश्यता आणि जातिभेदाविरुद्धही आवाज उठवला. त्यांनी १८७३ साली ''सत्यशोधक समाज'' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचा उद्देश समाजातील अंधश्रद्धा, जातीभेद आणि अन्याय दूर करणे हा होता. सत्यशोधक समाजाने समाजातील सर्व घटकांना समानतेचा संदेश दिला. महात्मा फुले यांचा विश्वास होता की सर्व माणसे समान आहेत आणि कोणताही मनुष्य जन्मतः श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसतो.

महात्मा फुले यांनी शेतकरी आणि कामगार यांच्या समस्यांकडेही विशेष लक्ष दिले. त्यांनी ''शेतकऱ्याचा आसूड'' हे पुस्तक लिहून शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा मांडल्या. त्यांनी शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. त्यांचे लेखन साधे, स्पष्ट आणि समाजजागृती करणारे होते. त्यांनी समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले.

महात्मा फुले हे केवळ समाजसुधारकच नव्हते, तर ते महान विचारवंत आणि लेखकही होते. त्यांनी ''गुलामगिरी'' सारखे महत्त्वाचे पुस्तक लिहिले. या पुस्तकातून त्यांनी समाजातील अन्याय आणि विषमता यांचा कठोर शब्दांत निषेध केला. त्यांचे विचार आजही समाजाला मार्गदर्शन करणारे आहेत.

महात्मा फुले यांचे कार्य इतके महान होते की समाजाने त्यांना ''महात्मा'' ही उपाधी दिली. त्यांनी आयुष्यभर समाजासाठी काम केले. २८ नोव्हेंबर १८९० रोजी त्यांचे निधन झाले, पण त्यांचे विचार आजही जिवंत आहेत. त्यांनी पेटवलेला शिक्षणाचा आणि समतेचा दीप आजही समाजाला प्रकाश देत आहे.

महात्मा फुले यांनी दिलेला समानता, शिक्षण आणि मानवतेचा संदेश आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचा आहे. समाजात अजूनही काही प्रमाणात भेदभाव आणि अंधश्रद्धा दिसून येतात. अशा वेळी महात्मा फुले यांचे विचार आपल्याला योग्य दिशा दाखवतात.

महात्मा फुले हे खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तनाचे दीपस्तंभ होते. त्यांच्या कार्यामुळे समाजात शिक्षणाचा प्रसार झाला, स्त्रियांना सन्मान मिळाला आणि समतेचा मार्ग खुला झाला.

त्यामुळे महात्मा फुले यांचे कार्य सदैव स्मरणात राहील आणि पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.

****

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559